# प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार का?




अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १८३ ■ शनिवार दि.२२ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 183 ■ Saturday Dt. 22 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4





# जयंत पाटील तिथे अस्वस्थ त्यांना तिथे करमत नाही ते भविष्यात पक्ष सोडतील!

## ■ शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांचा मोठा दावा?

## ■ वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यात बंद दरवाजाआड भेट?

## ■ राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण; तब्बल ३० मिनिटे चर्चा



बीड । प्रतिनिधी

पुण्यातील मांजरी येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमध्ये ज्येष्ठ नेते शरद पवार दाखल होण्यापूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यात बंद दरवाजाआड भेट झाली. दोघांमध्ये तब्बल ३० मिनिटे चर्चा झाल्याने राजकीय वर्तुळात अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. जयंत पाटील हे अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार का? असा चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि जयंत पाटील यांच्या भेटीनंतर राज्याचे सामाजिक न्याय मंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी मोठा दावा केला आहे. संजय शिरसाट म्हणाले की, मी अनेक वेळा सांगितलं जयंत पाटील तिथे अस्वस्थ आहेत, त्यांना करमत नाही. यापूर्वीच ते अजित दादा यांच्याबरोबर येणार होते. पण, काय झालं हे माहीत नाही. त्यांच्यात बंद दाराआड राजकीय चर्चा देखील होऊ शकते. मला त्याबाबत कल्पना नाही. मात्र, भविष्यात जयंत पाटील पक्ष सोडतील हे निश्चित असल्याचा दावा त्यांनी केला आहे.





### मविआकडून घडवून आणलेली दंगल

नागपूरमध्ये जी दंगल झाली आहे त्यामागे कोण आहे? याचा आम्ही विचार करत आहोत. याच सरकारमध्ये असे काही घटक आहेत का? ज्यांना मुख्यमंत्री हे गृहमंत्री म्हणून अपयशी आहेत असे दाखवायचे आहे का? या सगळ्याच्या मुळाशी कोण आहे? याचा विचार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करायला पाहिजे, असे वक्तव्य ठाकरेंच्या युवासेनेचे प्रमुख आदित्य ठाकरे यांनी केले. याबाबत विचारले असता संजय शिरसाट म्हणाले की, फडणवीसंना खाली दाखवण्यासाठी दंगल केली असेल तर यात हात कोणाचा आहे हे देखील सांगायला हवं होतं. महाविकास आघाडीने जाणूनबुजून घडवून आणलेली ही दंगल आहे. मात्र, आमचं सरकार यातील एकही आरोपी सोडणार नाही हे निश्चित असल्याचे त्यांनी म्हटले.

### संजय राऊत जे बोलतात, त्याच्या नेमकं उलट घडतं

अजित पवार आणि जयंत पाटील यांच्या भेटीवर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी नाराजी व्यक्त केली. त्यांचे उत्तम चाललेले असते. शिवसेनेतून आमचे जे काही लोक सोडून गेले आम्ही त्यांच्या शक्यतो वाऱ्यालाही फिरकत नाही. ज्या पद्धतीने महाराष्ट्राशी त्यांनी बेईमानी केली, गद्दारी केली आणि महाराष्ट्राच्या पाठीत खंजीर खुपसला, आम्ही त्यांच्या आसपासही जाणार नाही, असे त्यांनी म्हटले. याबाबत विचारले असता संजय शिरसाट म्हणाले की, ज्यांनी गद्दारी केली ते असे बोलतात का? शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराशी गद्दारी करून काँग्रेस, राष्ट्रवादीच्या मांडीवर बसणारे निष्ठेच्या गोष्टी शिकवतात. यामुळेच यांनी सगळा पक्ष संपवला. संजय राऊत जे बोलतात त्याच्या नेमकं उलट घडतं हा आतापर्यंतचा इतिहास आहे. म्हणून यापुढे उबाठा आणि राष्ट्रवादीत स्फोट होईल, असे त्यांनी म्हटले.

# ही कसली पोलिसींग? छेड काढणारे आरोपी सोडून पोलिसांचा पीडितांवरच 'रूबाब'

**बीड शहर पोलिस ठाण्यातील घटना; छेड काढणाऱ्यांविरूद्ध गुन्हा दाखल**

**अशा पोलीस अधिकाऱ्यांनी सामान्यांशी कसे बोलावे? याचे प्रशिक्षण देण्याची गरज?**

बीड । प्रतिनिधी

घरभेटी देणाऱ्या विद्यार्थिनीची दोन टवाळखोरांन छेड काढली. त्यांच्याविरोधात तक्रार देण्यासाठी मुलींसह प्राचार्या बीड शहर पोलिस ठाण्यात गेल्या. परंतू येथील पोलिस उपनिरीक्षकांनी आपण आजचे 'प्रमुख' असल्याचे सांगत पीडितांवरच रूबाब झाडला.

▶ पान २ वर



### पोलीस निरीक्षकांनी प्रशिक्षण द्यावे

शहर पोलिस ठाण्याचे शितलकुमार बल्लाळ अनेकदा तक्रारदार यांना कक्षात बोलावून घेत आधार देतात. त्यांना धीर दिल्यावर तक्रार घ्यायला सांगतात. परंतू त्यांच्याच ठाण्यातील दुययम अधिकारी असे वागत असल्याने संता व्यक्त करण्यात आला. त्यामुळे बल्लाळ यांनी अशा अधिकारी, कर्मचाऱ्यांना सामान्यांशी कसे बोलावे? याचे प्रशिक्षण देण्याची गरज आहे.

### मुलगा त्रास देईल, कोर्टात जावे लागेल

पीडित मुलगी व प्राचार्या पोलिस ठाण्यात गेल्यावर त्यांच्यावरच प्रश्नांची सरबत्ती करण्यात आली. तो मुलगा खूप डेंजर आहे, नंतर त्रास देईल. गुन्हा दाखल केला तर नंतर कोर्टात जावे लागेल, असे म्हणून पीडितांनाच भीती दाखविल्याचे सूत्रांनी सांगितले. हे समजल्यावरच आपण ठाण्यात धाव घेतली, असे डॉ.थोरात यांनी सांगितले.

### जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरातांची धाव!

पोलिसांकडून मुलींना भिती दाखविण्यासह तक्रार घेण्यास टाळाटाळ होत असल्याचे समजताच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात हे शस्त्रक्रिया गृहातून तातडीने पोलिस ठाण्यात दाखल झाले. १० मिनीटे त्यांनाही स्वत:ला ठाण्याचे 'प्रमुख' समजणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांनी रूबाब झाडला. आपल्याशीच असे वर्तण म्हणल्यावर सामान्यांशी कसे वागत असतील? असा प्रश्न डॉ.थोरात यांनी उपस्थित केला.

# बार्शी नाका येथे २६ वर्षापासून केले जाते इफ्तार पार्टीचे आयोजन

## नगरसेवक संजय उडाण यांच्या इफ्तार पार्टीतून हिंदू, मुस्लिम बांधवातील ऐक्याचे अनोखे दर्शन



बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील बार्शी नाका येथे नगरसेवक संजय उडान व बीएन मित्र मंडळाच्या वतीने मंगळवारी मुस्लिम बांधवांसाठी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बार्शी नाका तसेच परिसरातील मुस्लिम बांधव या इफ्तार पार्टीला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी नगरसेवक संजय उडान, माजी आमदार सय्यद सलीम, पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक मोदीराज, नितीन भैय्या धांडे, सभापती खुर्शीद आलम, मसीभाई, मशरूभाई पठाण उपस्थित होते. बार्शी नाका येथील रोजा इफ्तार पार्टीला गेल्या २६ वर्षाची परंपरा असून संजय उडान यांच्या वतीने आयोजित केलेल्या इफ्तार पार्टीच्या माध्यमातून बार्शी नाका भागात हिंदू, मुस्लिम ऐक्याचे अनोखे दर्शन घडते. तसेच या निमित्ताने एक सामाजिक सलोख्याचा संदेश देण्याचे काम नगरसेवक संजय उडान व बीएन मित्र मंडळाच्या वतीने केले जात असून याबद्दल बार्शी नाका व बीड शहरातून नगरसेवक संजय उडान व बीएन मित्र मंडळाचे भरभरून कौतुक केले जात आहे. बार्शी नाका येथील लोकप्रिय नगरसेवक तसेच सामाजिक कार्यातून आपली आगळी वेगळी ओळख निर्माण करणारे नगर सेवक संजय भाऊ उडान व बीएन मित्र मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बार्शी नाका येथे मुस्लीम बांधवांसाठी शुक्रवारी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. बीडमध्ये गेल्या २६ वर्षापासून बार्शी नाका येथील हिंदू, मुस्लीम ऐक्याचे अनोखे दर्शन घडवणारी ही इफ्तार पार्टी आहे. सध्या मुस्लिम बांधवांचा पवित्र असा रमजान महिना सुरू आहे. बीड शहरातील बार्शी नाका येथे गेल्या २६ वर्षापासून नगरसेवक संजय भाऊ उडाण व बीएन मित्र मंडळ यांच्या वतीने मुस्लीम बांधवांसाठी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन केले जाते. या निमित्ताने बार्शी नाका येथील हिंदू, मुस्लिम बांधवातील ऐक्याचा अनोखा संदेश देण्याचे काम नगरसेवक संजय उडाण व बीएन मित्र मंडळ यांच्या वतीने केले जात आहे. या बद्दल नगर सेवक संजय उडाण व बिएन मित्र मंडळाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.



# जीवाचीवाडी येथील जलजीवन पाणी पुरवठा योजन उपोषण स्थगित

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील जीवाची वाडी येथे दोन वर्षापासून जल जीवन पाणी पुरवठा योजनेचे काम मंद गतीने चालू असल्याने सध्याची भिषण पाणीटंचाई विचारात घेता गावातील ग्रामस्थ भागवत चौरे यांच्यासह जीवाची वाडी येथील हनुमान मंदिरावर दि.२० वेळ १०:०० वा. पासुन आमरण उपोषणास बसले आहेत पंधरा दिवसात योजना कार्यनीतन करा उपोषन चालु होते त्याची दखल घेऊन उप अभियंता श्रीमती वंदना साळवे सह कर्मचारी उपोषन स्थळी हजर होऊन जलजीवन मिशन योजना जिवाची वाडीत झालेल्या निकृष्ठ कामाची चौकशी मा.आयुक्त विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजी नगर कार्यालय मार्फत चौकशी करण्याचे लेखी पटविल्याने तुर्तास अमरण उपोषण स्थगीत करण्यात आले आहे. उपोषनस्थळी उप अभियंता श्रीमती वंदना साळवे, भागवत चौरे, दिगांबर चौरे, गोकुळ सारूक, चौरे बि.के.आसाराम चौरे, डॉ.दादासाहेब चौरे, भागवतफुंदे, राजाभाऊ केदार, गोपाळ चौरे, शिवाजी चौरे, इत्यादी उपस्थित होते.

> उपोषण स्थळी पोलीस बंदोबस्त दिसून आला नाही आमच्या प्रतिनिधीने पोलीस निरिक्षक वैभव पाटील यांच्याशी भ्रम्हध्वनी वर संपर्क केला परंतु संपर्क केला त्यांनी पोलीस उपोषनस्थळी तैनात केलेचे सांगीतले, परंतु वास्तकी रात्रभर उपोषन कर्ते विना बंदोबस्ता एकटेच हनुमान मंदिरावर बसलेचे दिसले.

भगवानगडाचे उत्तराधिकारी कृष्णा महाराज शास्त्री यांचे प्रतिपादन

# नाथषष्ठी उत्सव: नाथपरंपरेतील सर्वात महत्त्वाचा दुवा म्हणजेच भगवानगड

पैठण । प्रतिनिधी

शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराजांचे श्रीगुरु संत जनार्दन स्वामी यांचा जन्म, अनुग्रह आणि नाथांनी आपला देह गंगार्पण केलेली तिथी म्हणजेच फाल्गुन वद्य षष्ठी होय. या विशेष तिथीलाच 'नाथषष्ठी' असे म्हणतात. नाथांच्या जीवनातील महत्त्वाच्या घडामोडी या तिथीलाच घडल्यामुळे त्यांच्या जीवनामध्ये या तिथीला अनन्य साधारण महत्व आहे. नाथांच्या प्रती असलेली कृतज्ञता अभिव्यक्त करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रभरातून अनेक साधुसंतांच्या दिंड्या या तिथीला पैठणला येतात. तसेच देशभरातील हजारो भाविकही या दिवशी नाथांच्या दर्शनासाठी येतात. राज्यभरातून आलेल्या दिंड्यांचे प्रमुख पवित्र गोदावरीच्या तीरी आपापल्या फडांमध्ये किर्तन भजनाच्या माध्यमातून 'भानुदास-एकनाथ' नामाचा जयघोष करतात.

या सोहळ्यामध्ये भगवानगडाची दिंडीसुद्धा एक महत्त्वाची दिंडी असल्यामुळे वै.श्री संत भगवानबाबांपासून भगवानगडाच्या दिंडीला विशेष मान आहे. भगवानगडाहून निघाल्यापासून हजारो भाविक या दिंडीमध्ये सहभागी झाले होते. दिंडी पैठणमध्ये पोहोचल्यावर



फाल्गुन वद्य षष्ठी व सप्तमी हे दोन दिवस भगवानगडाच्या फडामध्ये नाथांच्या नामाचा जयघोष झाल्यानंतर परंपरेप्रमाणे अष्टमीच्या दिवशी ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांच्या आदेशानुसार भगवानगडाचे चतुर्थ उत्तराधिकारी ह.भ.प.श्री. कृष्णा महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने नाथषष्ठी सोहळ्याची सांगता झाली. यावेळी महाराजांनी सांगितले की, अभंग हे नामपर, उपदेशात्मक, स्थितीपर, आदेशपर, मागणीपर असतात. परंतु गौळण ही भक्ती व प्रेम रसाने परिपूर्ण असते. महाराजांनी काल्याच्या कीर्तनासाठी खालील गौळणीची निवड केली होती.

हरिनें माझे हरिले चित्त। भार वित्त विसरले।।
आतां कैसी जाऊं घरा। नव्हे बरा लौकीक।।
पारखियांसी सांगतां गोष्टी। घरची कुटी खातील।।
तुका म्हणे निवांत राहीं। पाहिले पाहीं परतोनी श्रश्र

काल्याच्या किर्तन प्रसंगी सदरील गौळणीचे विश्लेषण केल्यानंतर महाराजांनी नाथांच्या जीवन चरित्रालाही उजाळा दिला. यावेळी कृष्णा महाराज शास्त्रीजींनी सांगितले की, श्री संत एकनाथ महाराज हे श्री संत भानुदास महाराज यांचे पणतू होय. श्री भानुदास-चक्रपाणी-सूर्यनारायण-श्री एकनाथ महाराज अशी परंपरा आहे. मूळ नक्षत्रावर जन्म असल्याने बालपणीच आईवडील निवर्तले, असे महाराजांचे स्वतःचे म्हणणे आहे. 'मुळीच्या मुळी' या अभंगातून ते बोलतात. महाराजांचं घराणं अतिशय पवित्र असून, परंपरेने विठ्ठलभक्ती या घराण्यात केली जाते. विजयनगरचा राजा कृष्णदेवराय याने श्री विठ्ठलाची मूर्ती पंढरपूरहून आपल्या राजधानीत नेली होती. ती पुन्हा श्री संत भानुदास महाराज यांनी परत आणली. अर्थात, श्री विठ्ठलप्रेम हे परंपरेत मुरलेले आहे. तसे पाहिले तर सुर्यनारायनाची उपासना करणारे हे घर आहे; परंतु ओढा मात्र श्री विठ्ठल भक्तीकडे असल्याचे जाणवते. नाथ महाराजांचे गुरु हे श्री संत जनार्दन स्वामी होय. इ.स.१५०४ ते १५७५ हा स्वामींचा काळ होय. स्वामींचा जन्म फाल्गुन वद्य षष्ठीचा मानला जातो. स्वामींचा अनुग्रह व समाधी याच दिवशी मानली जाते. षष्ठीचा उत्सव नाथ महाराज यांनीच सुरु केला आणि याच दिवशी नाथ महाराज गंगार्पण झाले. नाथ महाराजांचा काळ इ.स.१५३३ ते १५९९ असा मानला जातो.

यावेळी कृष्णा महाराज शास्त्रीजींनी भगवानगडाच्या दिंडीबद्दल बोलताना सांगितले की, नाथषष्ठीला मराठवाड्यातून पहिली दिंडी ही श्री संत भगवानबाबांनी प्रारंभ केलेली आहे. तेव्हापासून श्री क्षेत्र भगवानगडाच्या दिंडीला नाथपरंपरेमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. आजही शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराजांच्या समाधी सोहळ्याच्या कीर्तनामध्ये पहिल्या चालीचा मान हा भगवानगडालाच दिला जातो. वै.श्री संत भगवानबाबांपासून चालू असलेली ही परंपरा वै.गुरुवर्य श्री संत भीमसिंह महाराजांनी तंतोतंत पाळली. तीच परंपरा पुढे ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री नामदेव महाराज शास्त्री बाबांच्या अध्यक्षतेखाली सुरू आहे. या परंपरेचे भगवानगडाचे सर्व उपसंस्थाने व सर्व भाविक भक्त अनुसरण करतात. काल्याच्या कीर्तनानंतर उपस्थित हजारो भाविकांना शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराजांचा महाप्रसाद देण्यात आला व नाथषष्ठी सोहळ्याची सांगता करण्यात आली.

# चवदार तळ्याच्या पाण्याचा सत्याग्रह मानवी हक्काची लढाई : अँड. सिद्धार्थ शिंदे

बीड । प्रतिनिधी

उच्च शिक्षण घेऊन विद्या विभूषित होऊन आपले संपूर्ण आयुष्यभर दीन दलित वंचित बहुजनांच्या व देशाच्या हिताकरता झटलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रत्येक लढा मानव विकास करता व स्वाभिमानाची लढाई होती. त्यापैकी त्या काळात नैसर्गिक संपत्ती पासून देखील दीनदलित अस्पृश्य समाजाला सार्वजनिक मालकीच्या पाण्याला देखील स्पर्श करू देत नव्हते, त्याकरता डॉ. बाबासाहेबांनी फुले, शाहूंच्या विचाराने प्रेरित झालेल्या त्या काळातील उच्चवर्णी यांच्या बहुमोल सहकार्यांनी महाड येथील चवदार तळयाच्या पाण्याकरता २० मार्च १९२७ रोजी सत्याग्रह केला होता. तो चवदार तळ्याच्या पाण्याचा सत्याग्रह मानवी हक्काची लढाई होती. त्या लढाईची स्मृति प्रेरणादायी आहे असे उद्गार अध्यक्षपदी लाभलेले अँड. सिद्धार्थ शिंदे यांनी काढले.



महामानव सार्वजनिक वाचनालय धानोरा रोड बीड येथे महाडच्या सत्याग्रह संग्राम दिन म्हणून संपन्न करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केले. तसेच थोर इतिहासकार व बहुजनांच्या हिताकरता व त्यांना अंधश्रद्धा अनिष्ट रुडी परंपरा पासून दूर राहण्याकरता प्रखर लेखन करणारे थोर वक्ते प्राध्यापक मा.म. देशमुख यांच्या दुःखद निधनादिनी त्यांच्या प्रतिमेस पुष्प, पुष्पमाला अर्पण करून भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाकरिता वंचित बहुजन आघाडीचे गेवराई तालुका महासचिव किशोर भोले, सैनिक दलाच्या वंदना वाघमारे प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. विचार मंचावर महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले प्रा. अशोक गायकवाड, सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक यू.एस. वाघमारे, यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाचाल तर वाचालचे अध्यक्ष डी.जी. वानखेडे यांनी तर सूत्रसंचालन डी.एम. राऊत यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष पुढे म्हणाले की सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीच्या यशाकरता एका विशिष्ट समुदायाचा लढा न उभारतात सर्व समावेशक समाज हिताकरता सर्वांनी सहभाग नोंदवून जसा चवदार तळ्याच्या सत्याग्रहांमध्ये डॉ. बाबासाहेबांच्या मानवी हक्क च्या लढाई करता सुरभा नाना टिपणीस, गंगाधर सहस्त्रबुद्धे, अनंत चित्रे, शेख बांधव ज्यांनी सत्याग्रहाच्या मंडपाकरता जमीन दिली होती. असे शेख बांधव यांनी बहुमोल सहकार्य करून तत्कालीन हक्क व कर्तव्याची पूर्णपणे जाणीव ठेवून लढा दिला तर यश नक्की मिळते हे महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रह दीपस्तंभ प्रमाणे प्रेरणादायी आहे त्या काळातील अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे किशोर भोले वंदनाताई वाघमारे, सुजाता वासनिक यांनी महाडच्या सत्याग्रहाबद्दल व थोडी इतिहासकार मा.म. देशमुख यांच्या जीवन कार्याबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे कार्यक्रमा अर्जुन जवंजाळ, एस.एस. सोनवणे, सुधाकर विद्याधर, विद्याधर नाणी, बि.डी. तांगडे, व महामानव अभिवादन ग्रुपचे बहुसंख्य सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार के.एस.वाघमारे यांनी व्यक्त करून सरणातयेने कार्यक्रमाची सांगता झाली.

# संध्या सरोदे यांची भेट देऊन पाहणी



बीड । प्रतिनिधी

अमृतास स्कूल ऑफ ब्युटी ऑन मेकअप आर्ट प्रा. लि. लोकशाही पत्रकार संघांचे सं. अ. भागवत वैद्य, महिला उद्योग विकास समितीचे प्रदेश कार्याध्यक्ष सौ. संध्या सरोदे यांनी भेट देऊन पाहणी केली. बीड जिल्ह्यात प्रथम महिला व मुलींना मेकअप आर्टिस्ट, ब्युटी पार्लर मालक, नौकर होण्याची संधी उपलब्ध करून दिल्या बद्दल इंटरनॅशनल मेकअप आर्टिस्ट कु. अमृता अविनाश नाईकवाडे व प्रशिक्षक राहुल यांना खूप खूप हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यांनी पण आमचा शिल्ड देऊन सन्मान केला. बीड जिल्ह्यातील महिलांनी ब्युटी पार्लर, मेकअप आर्टिव्स होऊन आपला व्यवसाय निर्माण करावा. मी पण इंटरनॅशनल मेकअप आर्टिस्ट आणि डाईट वेलनेस कोच आहे. लवकरच आपली एक शाखा परळी मध्ये चालू करण्याचा प्रयत्न करू. अशा भावना सौ. सरोदे यांनी व्यक्त केल्या.

पान १ वरून...

## ही कसली पोलिसींग? छेड काढणारे....

एवढेच नव्हे तर त्यांना आधार देण्याएवेजी भिती दाखविण्याचाही प्रयत्न केला. यात दोघांविरोधात गुन्हाही दाखल झाला. परंतू या प्रकाराने ही कसली पोलिसिंग? असा सवाल उपस्थित होत आहे. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात यांच्याशी बोलताना या अधिकाऱ्यांचा 'तोरा' कायम होता. शनिवारी दुपारी १२ वाजेच्या सुमारास हा प्रकार घडला.

बीड शहरात घरभेटी देण्याचे काम नर्सिंगच्या विद्यार्थीनी करत असतात. शनिवारी सकाळीही सहा जणींचा ग्रुप धांडे गल्लीत गेला. तेथे दुचाकीवरून आलेल्या दोन टवाळखोरांनी या मुलींना अडवून चिठ्ठी दिली. त्यात मोबाईल क्रमांक होता. घाबरलेल्या मुलींना पुन्हा दुसऱ्या ठिकाणी अडवले. यात इतर लोकांनी एका पकडले तर दुसरा पळून गेला. या प्रकरणात पीडित मुलीच्या तक्रारीवरून बीड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारामुळे मुलींमध्ये भितीचे वातावरण आहे.

# अन् दिव्यांगांच्या चेहऱ्यावर आले हासू फुलेले! ८० जणांना कृत्रिम हात-पाय प्रत्यारोपण

## पंचायत समिती येथे दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम हात, पाय बसविणे कैलीपर्स यांचे मोजमाप व ऑन द स्पॉट वितरण शिबीर संपन्न

परळी वैजनाथ । प्रतिनिधी


पंचायत समिती येथे परळी तालुक्यातील दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम हात, पाय बसविणे कैलीपर्स यांचे मोजमाप व ऑन द स्पॉट वितरण शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात ८० दिव्यांग बांधवानी लाभ मिळाला. ज्यावेळेस त्यांना हे कृत्रिम हातपाय लावण्यात आले, त्यावेळेस त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद गगनात मावेनासा झाला होता.

परळी पंचायत समिती सभागृह येथे दिव्यांग व्यक्तींचे जीवन थोडच्या प्रमाणात का होईना सुसह्य व्हावे यासाठी त्यांना कृत्रिम अवयव दिले जातात.त्यांना आता आधुनिक पद्धतीने तयार केलेले कृत्रिम हात व पाय वितरण करण्यात येत आहेत. याकरिता जिल्हा प्रशासन, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, बीड रा.स्व. संघ जनकल्याण समिती (महाराष्ट्र प्रांत) संचलित व एस. आर. ट्रस्ट मध्यप्रदेश व अलीमको, परळी वैजनाथ पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम हात, पाय बसविणे, कॅलीपर्स, स्प्लीट यांचे मोजमाप व तात्काळ (ऑन द स्पॉट) वितरण शिबीराचे सोमवार दि.१७ मार्च रोजी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा शुभारंभ परळी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे व स. पंचायत समितीचे गट विकास अधिकारी शिवाजी मुंडे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी सहायक प्रशासन अधिकारी निळकंठ दराडे, डॉ. रुपेश जाधव एस आर ट्रस्ट रातलम मध्य प्रदेश, रुक्मिणी सोनवणे, राम शर्मा, सुबेद्र ठाकूर, सुनील शर्मा, के.पी.सिग, सूर्या, मोनो हरि ओम शर्मा, दगडू भाळे व पंचायत समितीचे अधिकारी कर्मचारी उपस्थितीत होते.

दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम पद्धतीचे हात किंवा पाय चांगले व दर्जेदार तसेच त्यांना त्याचा अगदी सहजासहजी वापर करता यावा. यासाठी आर्टिफिशियल लिम्ज या आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तयार करण्यात आलेले आहेत. पंचायत समिती येथे कृत्रिम हात व पाय याचे मोजमाप व वितरण ऑन द स्पॉट करण्यात आले.

त्यासाठी कुठल्याही प्रकारचे शुल्क आकारले नव्हते. विशेष म्हणजे कृत्रिम हात व पाय वेगवेगळ्या प्रकारामध्ये उपलब्ध असल्यामुळे ते दिव्यांग व्यक्तींना हाताळणे सोयीस्कर झाले. त्यांना पूर्वीसारखेच अवयव भेटल्याचा अनुभव घेता येणार असल्याचे त्यांनी स. पंचायत समितीचे गट विकास अधिकारी शिवाजी मुंडे यांनी सांगितले.



# तांडा वस्तीवरील मुले घडले पाहिजे : प्रवीण काळे

## ४० वर्षांनंतर प्रथमच स्नेहसंमेलन साजरा : गटशिक्षणाधिकारी शिंदे

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील देवपिंपरी तांडा या ठिकाणी दि.०६ मार्च रोजी स्नेहसंमेलन आयोजित केले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री धनंजय शिंदे साहेब (गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती गेवराई ) तसेच उद्घाटक म्हणून श्री प्रवीण जी काळम पाटील ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी गेवराई व श्री गोविंदजी शेळके साहेब ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी गेवराई प्रमुख पाहुणे म्हणून फुलचंदजी बोरकर ( जि. प.सदस्य )बीड श्रीमती नंदाताई शिवाजीराव गवारे (सरपंच देवपिंपरी ग्रा.प) श्री सुदामराव पवार उपसरपंच देवपिंपरी ग्रामपंचायत श्रीतीर्थराज गवारे (से. सो चेअरमन) श्री बाबुराव पवार शिक्षण प्रेमी देवपिंपरी तांडा श्री रमेश राव पवार (ग्रा.प.सदस्य देवपिंपरी तांडा अंकुश राठोड (ग्रा प सदस्य देवपिंपरी तांडा) श्री शौकत जी शेख केंद्रप्रमुख खळेगाव श्री सुतार एस वाय केंद्रीय मुख्याध्यापक खळेगाव या सर्वांच्या उपस्थितीमध्ये स्नेहसंमेलनाचे उद्घाटन पार पडून १९८५ ची स्थापना असणारी जिल्हा परिषद शाळा देवपिंपरी तांडा या शाळेचे ४० वर्षांमध्ये हे पहिले स्नेहसंमेलन आयोजित केले होते.

२२ पटसंख्या असणारी सर्वात छोटी शाळा आणि अतिशय छान पद्धतीचे गाणे दैवत छत्रपती श्री गणेशा देशभक्तीपर गीत बंजारा संस्कृतीचे गीत हिंदी मराठी गीत विद्यार्थ्यांनी सादर करून उपस्थितांचे मने जिंकली याप्रसंगी शिंदे साहेब यांनी मनोगत व्यक्त करताना शाळेविषयी विद्यार्थ्याविषयी व एवढ्या छोट्या शाळेने छान कार्यक्रमाचे नियोजन केलं त्याबद्दल शुभेच्छा देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक



### देवपिंपरी तांडा येथील जिल्हा परिषद शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात

केले तसेच श्री काळम पाटील यांनी सत्कार न स्वीकारण्याचा केलेला पण विद्यार्थ्यांच्या घेऊन आलेल्या सत्कारापुढे गुडघे टेकून विद्यार्थ्यांच्या सत्काराचा स्वीकार केला व विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे मन भरून कौतुक करून शाळेचे व गावाचे खूप कौतुक करून शिक्षकांना शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक मुकुंद आहेर यांनी मात्र पाच वर्षाचा स्वप्न जे मी पाहिलं होतं त्या साकार झालं हा माझा स्वर्णक्षराने शाळेसाठी लिहिला जाईल जाणारा दिवस असेल असे मनोगत व्यक्त करून गाववाल्यांचे विद्यार्थ्यांचे याप्रसंगी याप्रसंगी श्रीविष्णू खेत्रे चेअरमन गेवराई शिक्षक पतसंस्था श्री अर्जुन जाधव सचिव गेवराई शिक्षक पतसंस्था श्रीमती दक्षा वानखेडे मॅडम उपाध्यक्ष गेवराई शिक्षक पतसंस्था श्री तात्यासाहेब मेघारे माजी चेअरमन श्री तारुळकर बापू श्री कुडके दाजी श्री लोणकर सर माजी सचिव श्री विष्णू आडे संचालक गेवराई शिक्षक पतसंस्था श्री जितेंद्र दहिफळे श्री विकास जी घोडके श्री सचिन दाभाडे श्री नितीन तिबोले श्री शेख सर ( सर्व संचालक गेवराई शिक्षक पतसंस्था श्री सेमे.सर श्री दयानंद जी कांडेकर सर श्री नरेंद्रजी ठाकूर सर श्री वैभवजी दमदाडे सर श्री हिवाळे सर श्री पवळ सर श्री दहिफळे सर श्री गरुड सर श्री बांगर सर श्री बारगजे सर श्री दिवेकर सर श्री रविंद्र ओहाळ सर श्री कैलास जी चव्हाण केंद्रप्रमुख जातेगाव श्री हुलसुते सर श्री संत सर डॉक्टर उमेश शिंदे श्री कैलासजी पट्टे सर श्री जानकीराम मत्रे सर श्री अंदुरे सर श्री सुभाष जी काळे सर नावडे काका श्री ज्ञानेश्वर पिंगळे उमापूर श्री अच्युत सर श्री कराळे सर श्री सय्यद सर पवार सर चादर सर ही पघंळ सर मस्के प्रशांत जी मस्के सर खळेगाव हून आलेले श्रीराम प्रसाद आहेत श्री अमोल आहेर श्री विनोद जी आहेर श्री संतोष जी आहेर श्री सचिन जी आहेर श्री साईनाथ आहेर श्री हर्षवर्धन आहेर नजर चुकीना कुणाचं नाव राहिले असेल तर क्षमस्व याप्रसंगी उपस्थितांचे मने जिंकून या सर्व गाणे बसवण्यामध्ये ज्यांचं मोठं योगदान आहे.

त्या ट्रेनी शिक्षिका कु. जागृती रमेश पवार यांनी खूप मेहनत घेऊन अतिशय छान पद्धतीचे गीते बसवले याबद्दल त्यांचे येणाऱ्या प्रत्येक पाहुण्याने व शाळेच्या वतीने शाळेचा मुख्याध्यापक या नात्याने मी त्यांचे मनापासून कौतुक करतो व तसेच आमचे ज्येष्ठ मार्गदर्शक पुढे सर यांचेही मोलाचे सहकार्य लाभले आणि हा कार्यक्रम छान झाला याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य श्री फुलचंदजी बोरकर यांनी माझा व पुढे सर व ट्रेनने शिक्षिका श्री पवार मॅडम या तिघांचे पण शाल श्रीफळ देऊन स्वागत केले सर्व उपस्थितांचे गावकऱ्यांचे व विद्यार्थ्यांचे आभार मानून या स्नेहसंमेलनामध्ये विद्यार्थ्यांसाठी पंचवीस हजार शंभर रुपयाची देणगी पालकांमधून व आलेल्या पाहुण्यांमधून जमा झाली. कार्यक्रमाची सांगता केली.



## गावंदरा येथे सरपंच व शाखा अभियंता यांनी संगणमत करून निधीत केला भ्रष्टाचार

धारूर । प्रतिनिधी

तालुक्यातील गावंदरा येथे सरपंच व शाखा अभियंता ग्रामसेवक यांनी संगणमत करून १५ व्या वित्त आयोगाच्या निधीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे. गावात नियमबाह्य पद्धतीने कामे करण्यात आली आहेत, अशी तक्रार गट विकास अधिकारी यांना निवेदनाद्वारे ग्रामपंचायत सदस्य छाया गोवर्धन बडे यांनी केली आहे.

गावंदरा येथे मागील दीड वर्षाच्या कालावधीमध्ये पंधराव्या वित्त आयोगाच्या माध्यमातून लाखो रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. परंतु या ठिकाणी सरपंच, ग्रामसेवक व शाखा अभियंता यांनी संबंधित सदस्यांना व गावास अंधारात ठेवून मोठ्या प्रमाणात नियमबाह्य पद्धतीने कामे करण्यात आलेले आहेत. विकासासाठी आलेल्या निधीची जीईएम पोर्टल वर बोगस खरेदी दाखवून अनियमितपणे विल्हेवाट लावली आहे तर काही कामात शाखा अभियंता ऋतुराज लांब व सरपंच यांनी संगणक करून चुकीचे मोजमापे करून निकृष्ट दर्जाची कामे करण्यात आली आहेत. करण्यात आलेल्या १५ व्या वित्त आयोगाच्या खर्च करण्यात आलेल्या निधीची चौकशी करून दोषी असणाऱ्या सरपंच, ग्रामसेवक व शाखा अभियंत्यावर कारवाई करण्यात यावी. आठ दिवसात चौकशी करून कारवाई न केल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असाही इशारा गटविकास अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे ग्रामपंचायत सदस्य छाया बडे, गोवर्धन संभाजी बडे यांनी दिला आहे.

# चिंच झोडपणी हंगाम सुरू; चिंच फोडून बेरोजगारीवर मात

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश परीसरात चिंच झोडणीचे काम जोरदार सुरू असुन चिंच फोडणीच्या कामामुळे ग्रामीण भागातील महिला मजुरांच्या हाताला काम मिळत आहे. चिंच फोडणीसाठी १२ रूपये किलो दर मिळत असुन एक महिला दिवसातुन २५ ते ३० किलो चिंच फोडणी करत असल्याने ३५० रुपयांपर्यंत रोजंदारी पडत असल्याचे वाघमारे यांनी सांगितले. शेतमजुर, महिला वर्ग आर्थिक संकटात असताना अशावेळी चिंच फोडणी कामाने महिलांच्या हाताला काम मिळाल्याने बेरोजगारीचा प्रश्न काही प्रमाणात मिटला आहे.



**चिंचा झोडण्याचे काम जिकिरीचे; पुर्ण कुटुंबाला रोजगार : थोरात**

चिंचा झोडण्याचे काम फेब्रुवारी मध्ये सुरू होऊन मे महिन्यांपर्यंत संपते. या ४ महिन्यात ग्रामीण भागात यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होते. झाडावर चढुन बांबुने झोडपुन चिंचा खाली पाडणे, पडलेल्या चिंचा वेचणे, त्यांच्यावरील टरफल बाजुला करणे, चिंचा फोडुन गर व चिंचोके वेगळे करणे आदी कामे कुटुंबातील महिला व मुले करतात. झाडांच्या फांदीवरून धोकादायक पद्धतीने झोडपणी करावी लागते. गेल्या १५ वर्षांपासून आम्ही भावंडे चिंचा झोडण्याचा व्यवसाय करत असल्याचे लिंबागणेश येथील अजय परमेश्वर थोरात यांनी सांगितले.

**यावर्षी बाजारभाव चांगले; परंतु आवक कमी : आवसरे**

गेल्या वर्षीच्या मानाने यावर्षी चिंचाला बाजारभाव चांगला मिळत असुन नगर येथील व्यापारी जागेवर येऊन माल घेऊन जातात. फोडलेल्या चिंचेला प्रतिकिलो ११ रूपये बाजारभाव मिळतोय. यावर्षी चिंचेच्या झाडांना चिंचेचे प्रमाण कमी असल्याने यावर्षी आवक कमी प्रमाणात असल्याचे लिंबागणेश येथील चिंचेचे व्यापारी चंद्रकांत आवसरे यांनी सांगितले.

# भोजगाव व कोमलवाडी येथील रेशनकार्ड धारकांनी ई-केवायसी करून घेणे : दत्ता संत

गेवराई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सरकारने रेशन कार्ड धारकांसाठी ई-केवायसी करणे अनिवार्य केले आहे. ज्याची अंतिम मुदत ३१ मार्च २०२५ आहे. ही प्रक्रिया पूर्ण न झाल्यास, रेशन कार्ड धारकांचे अनुदानित अन्नधान्य मिळणे बंद होऊ शकते. यामुळे भोजगाव येथील स्वस्त धान्य दुकान अंतर्गत असलेल्या रेशनकार्ड धारकांनी ई-केवायसी करणे आवश्यक आहे. शिधापत्रिकेत नावे असलेल्या कुटुंबातील सदस्यांनी ई-केवायसी पडताळणी प्रक्रिया पूर्ण न केल्यास संबंधितांना धान्य वितरणाचा लाभ मिळणार नाही, असे पुरवठा विभागाकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे भोजगाव येथील स्वस्त धान्य दुकान अंतर्गत असलेल्या भोजगाव



व कोमलवाडी या दोन्ही गावातील रेशनकार्ड धारकांनी लवकरात लवकर ई-केवायसी करण्याचे आवाहन स्वस्त धान्य दुकानदार दत्ता संत यांनी केले आहे.

केवायसी करण्यासाठी स्वस्त धान्य दुकानदार दत्ता संत हे दोन्ही गावातील रेशनकार्ड धारकांच्या घरी जाऊन ई केवायसी करून घेतली आहे. ई-केवायसी ही पॉस मशीनवर करावी लागत होती. त्यामध्ये सर्व्हर डाऊन होणे, वयस्कर आणि लहान मुलांचे ठसे उमटवण्यात येणार्या अडचणीमुळे केवायसी करण्यात अडचणी येत होती. त्यामुळे काही कार्ड धारक राहिले आहेत. त्यांच्यासाठी आता शासनाने 'मेरा ई-केवायसी' ॲप सुरू केले आहे. त्या पमुळे आता केवायसी करणे सुलभ झाली आहे. त्या पच्या माध्यमातून आता आपल्याला आपल्या मोबाईल मध्येच ई-केवायसी करता येणार आहे. यामुळे सर्व रेशन कार्ड धारकांनी येत्या ३१ मार्चपर्यंत आपली केवायसी स्वतः किंवा राशन दुकानदारांकडून करून घेणे. जर आपण ई-केवायसी केली नाही तर, आणि यामुळे रेशन कार्ड मधून आपले नाव कमी झाले तर याची सर्वस्व जबाबदारी स्वतःची राहील याला आम्ही जबाबदार राहणार नाही. त्यामुळे राहिलेल्या रेशन कार्डधारकांनी ३१ मार्च च्या आत आपली इ केवायसी करून घेणे, असे स्वस्त धान्य दुकानदार दत्ता संत यांनी सांगितले आहे.

# आष्टी तालुक्यात पहिली महिला पत्रकार प्रिया पवळ हिची निवड

आष्टी । प्रतिनिधी

आजपर्यंत पुरुष पत्रकार म्हणून आष्टी तालुक्यात भरपूर पत्रकार कार्यरत आहेत व पत्रकार काम करतात परंतु आष्टी तालुक्यात प्रिया सोन्याबापु पवळ ही पहिली पत्रकार होण्याचा मान तिने मिळवला. आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथीलही प्रिया पवळ प्रिया पवळ दैनिक पुढारीचे पत्रकार कवी प्रेम पवळ यांची ती बहीण तसं पाहिलं तर पवळ या घराण्याला पत्रकारितेचा वारसा आहे. प्रिया पवळ तिचे शिक्षण बीसीए सेकंड ईयर झाले असून तिला शैक्षणिक काळातच सामाजिक राजकीय लिखाणाचा छंद तिने जोपासला आणि आपणही



पत्रकार आहोत अशी इच्छा तिच्या मनात सारखीच होती अखेर तिने तिची इच्छा पूर्ण केली दैनिक टाइम्स (माजलगाव) या अग्रगण्य दैनिकांनी तिला आष्टी तालुका प्रतिनिधी म्हणून घोषित केले. पहिलीच महिला पत्रकार झाल्याने तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होऊ लागला आहे. ग्रामीण भागातील एक तरूणी पत्रकारिता क्षेत्रात पदार्पण करत असल्याने भविष्यात नक्कीच गावासह जिल्हयाचे नावलौकिक करील यात तीळमात्र शंका नसल्याचे दिसुन येत आहे.

# धारूर येथे भाजपा, मंडल बैठक पक्ष नोंदणी कार्यशाळा संपन्न

धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर येथे कैप्टन राजपालसिंह भैया हजारी इंग्लिश स्कूल या ठिकानी संघटन पर्व सदस्य नोदनी कार्यशाळा सम्पन्न झाली आपल्या मंडळाची संघटनात्मक विषयावर बैठक आयोजित केले होती. या बैठकीस भाजपा प्रदेश सचिव प्रवीण घुगे भाजपा जिलाअध्यक्ष शंकरराव देशमुख भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ स्वरुपसिंह सिंह हजारी समन्वय सदस्य नवनाच अच्चा शिराळे भाजपा जिला सरचिटनिस प्रा देवीदास नागरगोजे तालुका अध्यक्ष ॲड बालासाहेब चोले शहर अध्यक्ष दत्ता भाऊ धोत्रे युवा मोर्चा शहर अध्यक्ष ॲड मोहन भोसले सोशल मीडिया सयोंजक रोहनसिंह हजारी युवा नेते रामप्रभु मुंडे युवा नेते संदीप काचमुंडे नगर सेवक सचिन दुबे नगर सेवक गफार भाई नगर सेवक सुरेश लोकरे युवा नेते गोरख बापू घूमाल बापुराव धूमाल माजी तालुका अध्यक्ष अंगद मुंडे माजी तालुका अध्यक्ष सुरेंद्र तोनहे माजी तालुका अध्यक्ष अशोक करे, एडवोकेट नवनाथ रिपेलहर, नितिन कांबले, ज्येष्ठ अहमद भाई जिलानी भाई अकरम भाऊ सरपंच मल्हारी भालेराव साहेबराव चव्हाण शक्ती केंद्र प्रमुख, बुध प्रमुख सर्व सदस्य उपस्थित होते.




# गेवराईच्या सिध्देश्वर मंदिरात शिवपुराण

## ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाचा भाविकांनी लाभ घ्यावा

गेवराई । प्रतिनिधी



गेवराई शहरातील सावता नगर भागात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री. सिद्धेश्वराच्या कृपेने व गुरुवर्य परमपूज्य दिलीप बाबा उर्फ मसाननाथ महाराज घुगे श्री भगवान चिंतेश्वर मंदिर, गेवराई यांच्या कृपा आशीर्वादाने श्री शिव महापुराण कथा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

येथील तरुण बांधवांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सिद्धेश्वर संस्थान सावता नगर गेवराई येथे सातत्याने धार्मिक अध्यात्मिक सांप्रदाय सेवेतून वेगवेगळे उत्सव समितीच्या वतीने करण्यात येतात यात श्रीराम कथा, भागवत कथा किर्तन महोत्सव अखंड हरिनाम सप्ताह गेल्या बारा वर्षापासून अखंडितपणे आहे यावर्षी श्री. शिवमहापुराण कथा प्रवक्ते ह.भ.प. श्रीहरी महाराज रसाळ व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण नेतृत्व सत्यनारायण महाराज लगड यांच्या संकल्पनेतून संपन्न होणार आहे.

तसेच दैनंदिन कार्यक्रम पारायणाची वेळ सकाळी साडेसात व शिवपुराण कथेची वेळ संध्याकाळी सात असुन २४ मार्च सोमवार रोजी आरंभ होणार असून ३१ मार्च रोजी यांच्या ह.भ.प.श्रीहरी महाराज रसाळ यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होईल. नंतर महाप्रसाद वाटप होईल. परिसरातील भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले.

# विद्यार्थ्यांना छावा चित्रपट दाखवून समाजसेवक सुनील भाऊ ठोसर यांचा आगळावेगळा वाढदिवस साजरा

गेवराई । प्रतिनिधी

सुनील भाऊ ठोसर ही नेहमी सामाजिक कामात अग्रेसर असणारे आणि वेगवेगळ्या कल्पना मनामध्ये ठेवून प्रत्येक वाढदिवशी काहीतरी वेगळा करायचा प्रयत्न असणारे समाजसेवक आहेत या वर्षीचा वाढदिवस जि. प. प्रा शाळा पिंपरी तांडा व जि प प्रा शाळा जाधव तांडा केंद्र खळेगाव या दोन्ही शाळेच्या विद्यार्थ्यांना छावा चित्रपट दाखवून वाढदिवस साजरा केला तसं जर पाहिलं तर या तांड्यावरील विद्यार्थ्यांनी आतापर्यंत कधीच टॉकीज आणि चित्रपट पाहायला नव्हता त्यामुळे पहिलीच वेळेस पाहत असलेला चित्रपट आणि तो पण छत्रपती संभाजी महाराज यांच्या इतिहासावर असणारा छावा चित्रपट पाहताना विद्यार्थ्यांना खूप आनंद झाला तसेच यावर्षी



देवपिंपरी तांडा या ठिकाणी स्नेहसंमेलन पण खूप छान झाले हे अवचित साधून सुनील भाऊला वाटले काहीतरी वेगळं कराव म्हणून तांड्यावरील विद्यार्थ्यांना छावा चित्रपट दाखवून तालुक्यातीलच नव्हे तर जिल्ह्यातले पहिले उदाहरण असेल वाढदिवसानिमित्त ताड्यावरील विद्यार्थ्यांना चित्रपट दाखवाला दोन्ही शाळेतील २३ विद्यार्थ्यांसह देवपिपरी येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

देवपिंपरी ताड्याचे मुख्याध्यापक आहेर एम एस व ट्रेनी शिक्षिका कु पवार जे आर व जाधव तांड्याचे सहशिक्षक श्री मत्रे जानकीराम सह सुनील भाऊ ठोसर व त्यांच्या पत्नी याप्रसंगी उपस्थित होते विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना आणि पहिलीच वेळ चित्रपट पाहत आहोत याचा आम्हाला खूप आनंद झाला तसेच श्री आहेर एम एस यांनी पण प्रतिक्रिया देताना आमच्या विद्यार्थ्यांना छावा चित्रपट दाखवून सुनील भाऊ ठोसर यांनी खूप छान काम केले आहे अशी प्रतिक्रिया देऊन सुनील भाऊ ठोसर यांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा देऊन सर्व विद्यार्थ्यांना शिक्षक आणि शिवाजी महाराज याच्या प्रतिमेच्या टोफी वाटप करून विद्यार्थ्यांना जेवनाचा आरस्वाद देवून श्री आहेर सर यानी सुनील भाऊ सर यांचे विशेष आभार मानून समारोप करण्यात आला.

# ठेवीदारांच्या रेट्याने ज्ञानराधावर एमपीआयडी प्रस्ताव मंजूर : प्रा.उबाळे

## दोन वर्षांपासून सुरु असलेल्या ठेवीदारांच्या आंदोलनाला यश

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील दिवाळखोरीत निघालेल्या मल्टिस्टेट पैकी सर्वाधिक ठेवी असलेल्या ज्ञानराधा मल्टिस्टेटवर अखेर एमपीआयडी मंजूर केल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी अधिवेशनात केली. दरम्यान केवळ ठेवीदारांच्या रेट्याने शासनाला एमपीआयडीचा प्रस्ताव मंजूर करावा लागला असून ठेवीदारांच्या मागण्यांसाठी दोन वर्षांपासुन सुरु असलेल्या आंदोलनाला यश आले आल्याचे ठेवीदार कृती समितीचे राज्य समन्वयक तथा स्वाभिमानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सचिन उबाळे यांनी म्हटले आहे.**



जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), जिजाऊ मल्टीस्टेट, शुभ कल्याण मल्टीस्टेट, मातोश्री अर्बन, लक्ष्मीमाता अर्बन, मराठवाडा अर्बन (माजलगाव) आर्थिक दिवाळखोरीत निघालेल्या आहेत. यामध्ये मराठवाड्यातील लाखों ठेवीदारांच्या ठेवी अडकल्या आहेत. ज्ञानराधा मध्ये राज्यभरातील सर्वाधिक ठेवीदारांच्या ठेवी आहेत. ठेवीदारांच्या ठेवी परत मिळाव्या यासाठी ठेवीदार कृती समितीचे राज्य समन्वयक तथा स्वाभिमानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सचिन उबाळे यांच्या नेतृत्वाखाली वारंवार उपोषण, आंदोलने केल्याने बीड पोलिसांनी सुरेश कुटे यांच्यासह जवळपास सर्वच मल्टिस्टेटमधील आरोपींना अटक केली. सर्व आरोपींना अटक करणे हे आंदोलनाचे पहिले यश आहे. ज्ञानराधावर एमपीआयडी दाखल करावा, अर्चना कुटे यांना अटक करावी अशी मागणी सुरुवातीपासून प्रा.उबाळे यांनी लावून धरली होती. यामुळे एमपीआयडीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. मात्र काही त्रुटी निघाल्याने तो पुन्हा बीड पोलिसांकडे परत आला. या संदर्भात प्रा.उबाळे यांनी पोलिस अधीक्षकांची भेट घेऊन त्रुटींची पूर्तता करुन आठ दिवसांत एमपीआयडीचा प्रस्ताव शासनाकडे पुन्हा पाठवावा अशी मागणी केली होती. दरम्यान बीड पोलिसांनी पाठिवलेल्या ज्ञानराधावरील एमपीआयडीच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली असून या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी अधिवेशनात घोषण केली आहे. ठेवीदारांच्या रेट्यामुळे शासनाने एमपीआयडी मंजूर केला असून ठेवीदारांच्या आंदोलनाचे हे दुसरे यश असल्याचे प्रा.उबाळे यांनी म्हटले आहे.

### नितेश राणे, सुरेश धस, प्रकाश सोळंके यांचे मानले आभार

दरम्यान ज्ञानराधा व इतर मल्टिस्टेट संदर्भात आवाज उठविल्याबद्दल ना नितेशजी राणे, आ सुरेश अण्णा धस, आ प्रकाश दादा सोळंके, आ नारायण कुचे, आ बबनरावजी लोणीकर, आ मेघना बोर्डीकर यांचे प्रा.सचिन उबाळे यांनी आभार मानले आहे.

# जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या बोगस कामाची चौकशी करा : आडागळे

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील टाकरवन येथील जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या बोगस कामाची तात्काळ चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी कपिल आडागळे मानवी हक्क अभियान संघटना तालुका सचिव माजलगाव यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, टाकरवण येथील जलजीवन योजनेच्या कामात मोठा भ्रष्टाचार गुत्तेदार यांच्या मताने होत असल्याचे उघडकीस येत आहे. सदरील कामात पाईपलाईन या योजनेसाठी केंद्र शासनाकडून करोडो रुपयाचा निधी आला खरा पण गुत्तेदार यांच्या मताने बोगस होत असल्याचे दिसून येत आहे. गुत्तेदार यांचा मनमानी कारभार चालू आहे. सदरील पाईपलाईन चे काम ही निकृष्ट दर्जाचे झाले आहे तरी याकामाची केंद्रीय स्तरावरून चौकशी व्हावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी बीड, अभियंता पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद बीड यांनादिलेल्या निवेदनात कपिल आडागळे यांनी मागणी केली आहे. आज देशाला स्वातंत्र्य मिळून ७७वर्षे पूर्ण झाले परंतु देशाचा चालू असलेला विकास पाहून असं वाटते की, आजही इंग्रज बरे होते यांच्यापेक्षा अशी या राज्यकर्ते आणी प्रशासनाच्या कारभार बोगसगिरी, दादागिरी यावरून दिसून येत आहे असे मत कपिल आडागळे यांनी व्यक्त केले आहे.

प्रशासन हे अनेक ठिकाणच्या जल जीवन मिशन अंतर्गत चालू असलेल्या कामात बोगसगिरी करत असल्याचे समोर येत आहे. आपल्या डोळ्या समोर असे बोगस काम होत असताना प्रशासना तील अधिकारी भ्रष्ट मताने कारभारातून जल जीवन या कामाच्या पाहणी अंती असे निदर्शनास येते की, गुत्तेदार जगाव प्रशासना तील कर्मचारी जगाव माजलगाव तालुक्यात नव्हे तर देशात चालू असलेल्या जलजीवन कामाचा केंद्रीय पथका कडून याची तपासणी व्हावी व माझी कळकळीची विनंती आहे. प्रशासनाला आपण शासनाचा व गोरगरीब जनतेचा आपल्या थोडयाशा मोबदल्यामुळे करोडो रुपयांच्या योजना बोगस होत चालले आहेत. माजलगाव तालुक्यातील टाकरवण येवता जलजीवन कामाच्या होत असलेल्या कामावरून दिसून येत आहे.



# चौसाळा शाळेचा मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात प्रथम क्रमांक

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा शाळेत वेगवेगळे उपक्रम घेतले जातात. यामध्ये ऍस्ट्रॉनिक क्लब, बाल वैज्ञानिक स्पर्धा, बीड जिल्हा परिषदेने घेतलेल्या इस्रो व नासा सहल अभ्यास दौऱ्यासाठी घेतलेल्या परीक्षेत शाळेचे विद्यार्थी पात्र ठरले आहेत, आंतरजिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन मोठे यश संपादन केले आहे, शाळेमध्ये इयत्ता नववी व दहावीसाठी दोन व्यवसायिक अभ्यासक्रम देखील आहेत, व्यवसाय अभ्यासक्रमाचा उपयोग भविष्यात मुलांना रोजगार मिळण्यासाठी होतो. शाळेमध्ये परसबाग आहे त्यामध्ये येणाऱ्या भाजीपाला उपयोग शालेय पोषण आहारामध्ये केला जातो, सांडपाण्याची व कचरा पर्यावरण पूरक व्यवस्थापन केले जाते. इतिहास व भूगोल प्रज्ञाशोध परीक्षा यामध्ये देखील विद्यार्थी यशस्वीरित्या यश संपादन केला आहे, राज्य रस्ता सुरक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकासह चमकदार कामगिरी केली आहे. असे एक ना अनेक उपक्रम शाळेमध्ये राबवले जातात त्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक – १ या स्पर्धेत तिसरा क्रमांक मिळाला होता त्यावेळीही शाळेला एक लाख रुपये बक्षीस मिळाले होते.

माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक –२ जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चौसाळा शाळेने प्रथम क्रमांक मिळवला आहे. शाळेच्या प्रगतीचा आलेख दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच शाळेला असणारे भौतिक सुविधा यामध्ये मुलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह पिण्याच्या पाण्याची सोय, याचा विद्यार्थ्यांना फायदा होत आहे व त्यांच्या ज्ञानात भर पडून, कलागुणांना वाव मिळत आहे, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत स्पर्धेत टप्पा क्रमांक दोन मध्ये प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजा हंपे, ज्येष्ठ शिक्षक श्री सुभाष काकड,तंत्रस्नेही शिक्षक श्री सुधीर जाधव तसेच सर्व शिक्षक शिक्षिका इतर कर्मचारी यांचे शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती प्रणिता गंगाखेडकर मॅडम, गटशिक्षणाधिकारी समंदर खान, केंद्रप्रमुख शंकर पाटील सरपंच श्रीमती मंगल ताई प्रेमचंद लोढा शालेय समितीचे अध्यक्ष विनोद शिंदे उपाध्यक्ष श्रीमती दुर्गा जोगदंड, सर्व सदस्य यांनी शुभेच्छा दिल्या.

# अनिलदादा जगताप फाउंडेशनकडून मंजेरी हवेली शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या वाटप

बीड । प्रतिनिधी

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या समाज कार्याला प्रभावित होऊन बीडमधील असंख्य तरुणांनी एकत्रित येऊन समाजसेवेचे कार्य करण्यासाठी अनिलदादा जगताप फाउंडेशनची स्थापना केली. या फाउंडेशनच्या माध्यमातून समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात दिला जातो. याबरोबरच समाजपयोगी उपक्रम राबविले जातात.




अनिलदादा जगताप फाउंडेशनचे सचिव आकाश भैय्या जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पाली सर्कलमधील जिल्हा परिषद शाळा (मंजेरी हवेली) येथील विद्यार्थ्यांना दि.२१ मार्च २०२५ रोजी अनिलदादा जगताप फाउंडेशनच्या वतीने वह्या वाटप करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक तथा पालकांच्या उपस्थितीमध्ये अनिलदादा जगताप फाउंडेशनचे कार्यवाहक प्रतिक कांबळे यांनी या वह्या वाटप केल्या. जिल्हा परिषद शाळा मंजेरी हवेलीचे मुख्याध्यापक सय्यद सर आणि उपस्थित पालकांनी यांनी अनिलदादा जगताप फाउंडेशनचे आभार व्यक्त करत फाउंडेशनच्या समाजसेवेच्या कार्याचे कौतुक केले आणि अनिलदादा जगताप फाउंडेशनच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# धारूर तालुक्यातील ५६ ग्रामपंचायतचे सरपंचपदांची आरक्षण सोडत २५ मार्चला

धारूर । प्रतिनिधी

पुढील पाच वर्षासाठी तालुक्यातील ५६ ग्रामपंचायत चे सरपंच पदांची आरक्षण सोडत शासकीय नियम व आदेशा नुसार २५ मार्च रोजी सकाळी सकाळी ११–०० वाजता काढण्यात येणार आहे तरी तालूक्यातील नागरीकानी उपस्थीत राहावे असे आवाहन तहसीलदार श्रीकांत निळे यांनी केले आहे. धारूर तालुक्यातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील राजपत्र अस प्रमाणे तालुकानिहाय जिल्हयातील सरपंचाची पदे वेगवेगळ्या प्रवर्गासाठी व महिलांसाठी पाच वर्षाकरिता सन २०२५ ते २०३० या दरम्यान गठीत होणा–या ग्रामपंचायतीकरिता आरक्षित करून संख्या निश्चित करण्यात आलेली आहे. धारूर तालुक्याचा आरक्षण तपशिल सरपंच पदे पुढील प्रमाणे अनुसूचित जाती–०९पदे, अनुसूचित जमाती–०२ पदे, नागरिकांचा मागास प्रवर्ग–१५ पदे, खुला प्रवर्ग–३० पदे असे एकुण ५६ ग्रामपंचायतच्या सरपंच पदाचे आरक्षण सोडत दिनांक. २५ मार्च रोजी सकाळी ११:०० वा. तळमजला, तहसिल कार्यालय धारूर येथे काढण्यात येणार आहे. तरी तालुक्यातील नागरिकांनी सदरचे आरक्षण सोडतीस उपस्थित रहावे असे आव्हान तहसीलदार श्रीकांत निळे यांनी केले आहे.

# उद्या स्वरेशा पोरे यांचे गायन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील संगीत साधना मंचच्या वतीने शास्त्रीय संगीत साधक व रसिकांसाठीच्या मासिक सभेत आज रविवार २३ मार्च रोजी होणाऱ्या सभेत पुणे येथील प्रख्यात गायिका स्वरेशा पोरे (कुलकर्णी) यांचे स्वतंत्र गायन होणार आहे. संवादिनीवर विश्वजित धाट हे तर रत्नदिप शिगे तबल्यावर साथसंगत करतील खोलेश्वर महाविद्यालयाच्या स्व. गोपीनाथ मुंडे सभागृहान सकाळी साडे दहा वाजता होणाऱ्या या मासिक संगीत सभेचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.





# स्व. विमलताई मुंदडा यांच्या स्मृतीदिनी प्रा. ईश्वर मुंडे यांनी घेतले स्मृतीस्थळाचे दर्शन

धारूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या माजी मंत्री स्व.विमलताई मुंदडा यांच्या स्मृतीदिनी चनई, अंबाजोगाई येथील स्मृती स्थळावर जाऊन प्रा.ईश्वर मुंडे यांनी आज दर्शन घेऊन विनम्र अभिवादन केले.

या वेळी बोलताना प्रा.ईश्वर मुंडे म्हणाले की, स्व.विमलताई मुंदडा या माझ्या राजकारणातील बालवाडीच्या शिक्षिका होत्या. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब व मुंदडा कुटुंबीय एकत्र आसताना वयाच्या १६ व्या वर्षा पासून मी स्व.विमलताई मुंदडा व नंदकिशोर मुंदडा (काकाजी) यांच्या संपर्कात आलो. समाजकारण व राजकारणाचे बाळकडू या उभयतांकडूनच मिळाले तसेच शैक्षणिक क्षेत्र, समाजकारण व राजकारणात पद– प्रतिष्ठा मिळाली. पुढे मतदार संघ व पक्ष बदल झाले परंतू ह्रदयाच्या एका कोपऱ्यात मुंदडा कुटुंबीयाचे स्थान कायम आहे. याची उतराई म्हणून आज २२ मार्च २०२५ रोजी स्मृतीस्थळी जाऊन दर्शन घेतले. यामुळे सकारात्मक समाजकारण व राजकारणाची उर्जा मिळाली.

# लोकाशा महोत्सवासाठी अजित पवार, पंकजाताईची प्रमुख उपस्थिती

## २ एप्रिलला दिमाखदार सोहळा; एक लक्ष रुपये रोख, सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह देऊन होणार गौरव

बीड । प्रतिनिधी

दैनिक लोकाशाच्या वर्धापन दिनानिमित्त दि.३१ मार्च ते २ एप्रिल दरम्यान लोकाशा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, लोकाशा महोत्सवाचा समारोप राज्याचे उपमुखमंत्री तथा बीड जिल्हयाचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पकंजाताई मुंडे यांच्यासह राज्यातील अनेक दिग्गज नेत्यांसह बीड जिल्ह्यातील खासदार, आमदार, सर्व लोकप्रतिनिधी यांची उपस्थिती राहणार आहे. लोकाशा महोत्सवात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना लोकाशा भूषण पुरस्कार देऊन, गौरविण्यात येणार आहे. एक लक्ष रुपये रोख, सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. सामजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल शांतीलालजी मुथा, कला क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीसाठी प्रसिध्द अभिनेते सयाजी शिंदे, सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल बुलढाणा अर्बनचे संस्थापक राधेशामजी चांडक, क्रिडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल प्रसिद्ध कुस्तीपटू राहूल आवारे, पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीबद्दल टी.व्ही.–९ च्या अँकर निखीला म्हात्रे आरोग्य क्षेत्रातील कामगिरीबद्दल ओमप्रकाश शेटे, व मंगेश चिवटे पत्रकारितेच्या क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल विलास बडे यांना यावर्षीचा लोकाशा भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला असून, दि.२ एप्रिल रोजी सायं. ५ वाजता दैनिक लोकाशाच्या प्रांगणात दिमाखदार सोहळयात या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती संपादक विजयराज बंब यांनी दिली.




लोकाशा महोत्सवा संदर्भात माहिती देताना, संपादक विजयराज बंब यांनी सांगितले की, लोकाशा महोत्सवाची सुरुवात २०१० साली करण्यात आली होती. यावर्षी लोकाशाच्या १९ व्या वर्धापन दिनानिमित्त दि.३१ मार्च ते २ एप्रिल दरम्यान राज्यस्तरीय लोकाशा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.३१ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता होम मिनिस्टर खेळ पैठणीचा हा क्रांतीनाना मळेगावकर यांचा कार्यक्रम होणार आहे. यामध्ये सहभागी होणाऱ्या सर्व महिलांना भेटवस्तू देण्यात येणार आहे. होम मिनीस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमातील विजेत्या महिलांना प्रथम बक्षीस कुलर, द्वितीय बक्षीस सोन्याची नथ तर तृतीय बक्षीस आकर्षक पैठणी मिळणार आहे. दि.१ एप्रिल रोजी सायं.५ वाजता खुल्या व सोलो डान्स स्पर्धा होणा आहेत. खुल्या डान्स स्पर्धेतील स्पर्धकांना प्रथम बक्षीस ११००० रूपये, दितीय बक्षीस ५००० रूपये, तर तृतीय बक्षीस ३००० रूपये मिळणार आहे. सोलो डान्स स्पर्धा दोन गटात होणार असून, दोन्ही गटाना प्रत्येकी प्रथम बक्षीस ५००० रूपये, द्वितीय बक्षीस ३००० रूपये, तर तृतीय बक्षीस २००० रूपये देण्यात येणार आहे.

### अमृतमहोत्सवी सत्कार

लोकाशा महोत्सवात ज्या दांम्पत्यांचे वय ७५ वर्षापेक्षा अधिक आहे अशा ७५ दांम्पत्यांचा अमृत महोत्सवी सत्कार करण्यात येणार आहे, यशिवाय जे कुटुंब एकत्र राहते अशा २५ आदर्श कुटुंबाचा सत्कार करण्यात येणार आहे. लोकाशा महोत्सवातील सर्व कार्यक्रमास बीड शहर व जिल्ह्यातील जनतेने मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संपादक विजयराज बंब व लोकाशा महोत्सव समितीने केले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT